

|| वर्ष - 7 | अंक - 313 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- माहीने लावली विक्रमांची रांग!
- लांडेंची ताकद महायुती सोबतच!
- मोदींची गॅरंटी ही चीनच्या वस्तूंसारखी
- वैद्यकीय क्षेत्रात देशाची प्रगती

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 2 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## 40 वर्षांतील सर्वाधिक कर संकलन

# महापालिकेची ऐतिहासिक करवसुली!

### » प्रथमच तब्बल 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर वसूल

**। पिंपरी । महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने 2023-24 या आर्थिक वर्षात तब्बल 977 कोटी 50 लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. महापालिकेच्या 41 वर्षांच्या इतिहासात प्रथमच 1 हजार कोटींच्या जवळपास टप्पा गाठला आहे. हा कर संकलन विभागाचा एक माईलस्टोन ठरला आहे. 6 लाख 25 हजार मालमत्ता धारकांपैकी 5 लाख 11 हजार 154 मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे.**






“ यावर्षी प्रथमच सिद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गट महिलांकडून बिले वाटप, डाटा अनालिसिस, जनजागृतीसाठी उत्तम क्रिएटिव्ह, सर्व सेवा ऑनलाईन करणे अशा विविध माध्यमातून नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचाच हा परिणाम आहे.

**–शेखर सिंह,** आयुक्त.



“ यंदा आम्ही प्रथमच मालमत्ता कर आणि पाणी पट्टी वसुली एकात्मिक पद्धतीने वसूल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मालमत्ता कर आणि पाणीपट्टी दोन्हींमध्ये भरघोस वाढ झाली आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेली जप्ती मोहीम आणि यंदा जप्ती केलेल्या मालमत्तांची प्रथमच राबवलेली लिलाव प्रक्रिया याचाही कर संकलनाला उपयोग झाला आहे. **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त.



“ माननीय आयुक्त यांचे कर संकलन विभागाचे व्हिजन आणि माननीय अतिरिक्त आयुक्त यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन यामुळे आम्ही हा टप्पा गाठू शकलेलो आहोत. येत्या वर्षभरात माननीय आयुक्त यांचे व्हिजन संपूर्णतः अंमलात आणण्याचा आमचा नम्र प्रयत्न राहील.

**–नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर प्रमुख स्त्रोत आहे. महापालिका हद्दीत 6 लाख 25 हजार मालमत्ता आहेत. यापैकी 5 लाख 11 हजार 154 मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे.

कर संकलन व कर आकारणी विभागाने गतवर्षी 816 कोटींचा कर वसूल केला होता. यंदा तब्बल 161 कोटींचा अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. यंदा कर वसुलीसाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांच्या टीमने मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली आहे.

## खासदार बारणेंनी घेतली डॉ. धर्माधिकारी यांची भेट!

### » लोकसभा निवडणूक रणसंग्राम : मावळात प्रचाराला केली सुरुवात

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप, राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी ज्येष्ठ निरुपणकार, महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेतली. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांचे आशीर्वाद घेत खासदार श्रीरंग बारणे यांनी रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रचाराला प्रारंभ केला आहे.**



भाजप, शिवसेना महायुतीकडून मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना तिसऱ्यांदा उमेदवारी मिळाली आहे. बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघांत जाऊन आजी, माजी आमदार, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या गाठीभेटी सुरु केल्या आहेत. दरम्यान, सोमवारी (दि. १) खासदार श्रीरंग बारणे यांनी अलिबागमधील रेवदंडा येथे ज्येष्ठ निरुपणकार आणि महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब नानासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. डॉ. आप्पासाहेब नानासाहेब धर्माधिकारी यांच्या भोवती सकारात्मक ऊर्जा आहे. या ऊर्जेची अनुभूती आजच्या या भेटीत झाल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. दरम्यान, खासदार बारणे यांनी आलिबाग विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी दळवी परिवाराने बारणे यांचे स्वागत केले आणि निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.

### दिवंगत माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली...

»माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांचे मागील आठवड्यात निधन झाले. अलिबाग मतदारसंघातून त्या सन 1995, 1999 आणि 2009 अशा तीन वेळेला विधानसभेवर निवडून गेल्या होत्या. त्या काही काळ राज्यमंत्री देखील राहिल्या. त्यांच्या निधनाने एक अभ्यासू, कार्यतत्पर, लोकाभिमुख नेतृत्व हरपले. खासदार श्रीरंग बारणे यांनी मीनाक्षी पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली. आणि पाटील परिवाराचे खासदार बारणे यांनी सांत्वन केले.

# शिरूरमध्ये आढळरावांना ताकद द्या!

## » लोकसभा रणसंग्राम : चंद्रकांत पाटलांचं महायुतीच्या नेत्यांना आवाहन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीची समन्वय बैठक पार पडली. या बैठकीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना महत्वाच्या सुचना यावेळी केल्या.**




तसेच लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना विजयी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की, देशभरातल्या ५७२ लोकसभेच्या जागांना एक क्लस्टर प्रमुख अशी विभागणी केली आहे. महाराष्ट्रातल्या ४८ जागांसाठी १६ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६ प्रभारी जणांची एक संयुक्त बैठक पार पडली. त्या क्लस्टर प्रमुखांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या तीन लोकसभातील महायुतीतील २० पक्षांच्या नेत्यांची मोट बांधायची, संवाद निर्माण करायचा असं ठरवण्यात आलं. पंधरा दिवसापुर्वी बारामती लोकसभेची बैठक पार पडली. त्यानंतर पुणे लोकसभेकरीता विधानसभानिहाय बैठक केली. त्यानंतर आता शिरूर लोकसभेसाठी बैठक पार पडली. यामध्ये सर्व महायुतीच्या नेत्यांची ताकद लावावी, सगळे रूसवे फुगवे दुर व्हावे यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

**“ शिरूर लोकसभा मतदारसंघात काही कार्यकर्त्यांना न आवडणारा निर्णय झाला आहे. ही काही नेत्यांच्या मनात दुहेरी भावना निर्माण झाली आहे. ही भावना त्यांच्या मनातून काढण्यास कार्यकर्ते सक्षम आहेत का ? त्यावर चंद्रकांत पाटलांनी अस्सल गावरान पद्धतीने उत्तर दिले आहे. ग्रामीण भागात एका मुलाने कुटुंबातील सगळ्यांना न आवडणाऱ्या मुलींसोबत लग्न केले. परंतु नंतर सगळे तीला स्विकारतात. मग ती सून सगळ्यांची लाडकी सून होते.**

**-चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.**

### नाराजी सोडा, प्रचार करा...

» शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या विरोधात नाराजी आहे. तसेच अनेक जण अजूनही इच्छूक आहेत. यावर बोलतांना ते म्हणाले की, महायुतीमध्ये तीन प्रामुख्याने पक्ष आहेत. त्या पक्षातील नेत्यांना उमेदवारी मिळाली आहे. राहिला प्रश्न मित्र पक्षांचा. तर महादेव जानकर यांना उमेदवारी मिळाली आहे. आता जे काही नेते आहेत. त्यांनी त्या त्या मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करावा, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

# आमच्यासाठी फक्त ‘कमळ’ हाच उमेदवार!

## » जगदीश मुळीक : मोहोळ यांना अधिक मताधिक्य आमची जबाबदारी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अन्य पक्षांप्रमाणे आमच्या पक्षातील निवडणुकीत उमेदवारीसाठी स्पर्धा, चुरस असते. पक्षाची उमेदवारी फक्त एकालाच मिळते. पण भारतीय जनता पक्षात उमेदवारीसाठीही चुरस असते. पण उमेदवाराच्या नावाची घोषणा झाल्यानंतर मी काय किंवा मुरलीधरआण्णा काय आमच्या सर्वांसाठी फक्त कमळ हाच उमेदवार असतो. त्याच्या विजयासाठीच सर्वजण प्रयत्न करतो.**



यावेळीही माझ्यासह आपण सर्वांनी सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा जास्त मताधिक्य देण्यासाठी पुढील सर्व दिवस कार्यरत राहू’, असे आवाहन माजी आमदार आणि भाजपचे माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी वडगाव शेरीतील मेळाव्यात केले.वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे, महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, माजी आमदार बापूसाहेब पठारे, शिरूर पंचायत समितीचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र जासुद, हवेली बाजार समितीचे माजी उपसभापती राजेद्र कंद, हवेली बाजार समितीचे संचालक नानासाहेब आबनावे, भाजपाचे तालुका अध्यक्ष आबासाहेब सोनावणे, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य राहुल पाचरणे, भाजपा जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष संदीप सोनावणे, नगरसेवक राहुल भंडारे, सचिन पलांडे, रोहित खैरे, केशव पाचरणे, संतोष भरणे, सचिन सातपुते, अनिल नवले यांच्यासह श्रीगोंदा-पारनेर-हवेली तालुक्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात रहायला असलेले नागरीक, तरूण मोठ्या संख्येने मेळाव्याला उपस्थित होते.

जगदीश मुळीक म्हणाले, ‘ही निवडणूक देशासाठी फार महत्वाची आहे. कारण आपण सन २००४ ते २०१४ काँग्रेस-युपीएचे सरकार आणि २०१४ ते २०२४ भाजपचे एनडीएचे सरकार देशात बघितले आहे, अनुभवले आहे. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने देशात विकासाची कामे केली. पण कोणीही विरोधक भ्रष्टाचाराचा आरोप करू शकत नाही. या उलट सर्वसामान्य व्यक्तींशी सहजपणे संवाद साधणारा पंतप्रधान देशवासीयांनी प्रथमच बघितला. काय करणार यापेक्षा काय केलं, हे सांगणारे सरकार मोदी यांनी दिले असल्यानेच त्यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी देशवासी उत्सुक आहेत. त्यात आपण वडगावशेरीतील सर्वांनी आपला वाटा उचलूयात आणि कमळ फुलवत मुरलीधर मोहोळ यांनी प्रचंड मताधिक्याने दिल्लीत पाठवू या’.

**“ ‘वडगाव शेरी आणि नगर रोड परिसरातील नागरीकांसाठी भामा आसखेडमधून पाणीपुरवठा करणार, असे आम्ही ऐकत होतो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या विषयाला चालना दिली. एक गोष्ट सांगितलीच पाहिजे की महापौर म्हणून मुरलीधर मोहोळ हेसुद्धा यासाठी किती आग्रही होते, हे मी बघितले आहे. जनहिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणारा एक चांगला उमेदवार आपल्याला त्यांच्या रूपाने मिळालेला आहे. ते निवडून येतीलच, पण आता त्यांनाजास्त मताधिक्य देणे ही माझ्यासह आपली सर्वांची जबाबदारी आहे.**

**-सुनील टिंगरे, आमदार, राष्ट्रवादी.**

## महापालिका प्रशासनाला 78 कोटींचा गल्ला!

# पाणीपट्टी वसुलीचा ‘विक्रम’!

### कर संकलन-पाणीपट्टी एकत्र वसुली धोरण यशस्वी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाने 977 कोटींचा सर्वाधिक कर वसूल केल्यानंतर पाणीपट्टी वसुलीचा एक नवा विक्रम झाला आहे. 78 कोटी 57 लाखांची पाणीपट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. त्यामुळे कर संकलन आणि पाणीपट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय अतिशय यशस्वी झाला आहे.**




**“मालमत्ता कर आणि पाणीपट्टी यांचे एकत्रीकरण निविदा प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीपट्टी आणि मालमत्ता कर एकत्रित भरणे शक्य होणार आहे. त्यामुळे पालिकेचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे. तसेच पालिकेची पाणी पुरवठा स्कॅडा सिस्टिम शेवटपर्यंत म्हणजे नळ कनेक्शनपर्यंत वापरता येईल का याचा विचार चालू आहे. त्यामुळे पाणी गळती (WATER LEAKGES), नेमकी महसूल गळती (NON REVENUE WATER) यांचा ताळमेळ घालणे शक्य होईल. त्यामुळे पाणी पुरवठा सेवेचा दर्जा वाढवण्यात मदत होईल.अर्थात हे काम आव्हानात्मक राहणार आहे.**

**– शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा 1 लाख 76 हजार अधिकृत नळ जोडधारक आहेत. महापालिकेला पाणी पुरवठा विभागकडून म्हणावे तसे उत्पन्न मिळत नसून थकबाकीही वाढत होती. एकीकडे मिळकत करातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत होता. तसेच पाणीपट्टीची थकबाकीही मोठ्या प्रमाणावर राहत होती. राज्यातील काही महापालिकांमध्ये पाणीपट्टी वसुली आणि कर वसुलीचे एकत्रित कामकाज चालते. त्या महापालिकांचा पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने अभ्यास केला. 2023-24 या आर्थिक वर्षापासून कर संकलन आणि पाणीपट्टी एकत्र वसुल करण्याचा धाडसी निर्णय आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी घेतला.

हा निर्णय सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी यशस्वी करून दाखवला असून 2023-24 या आर्थिक वर्षात तब्बल 78 कोटी 57 लाख रूपयांची पाणीपट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.

| वर्ष | वसूल झालेली पाणीपट्टी |
|---|---|
| 2019-2020 | : 42 कोटी 94 लाख |
| 2020-2021 | : 41कोटी 86 लाख |
| 2021-2022 | : 54 कोटी 97लाख |
| 2022-2023 | : 57 कोटी 67 लाख |



### 300 पेक्षा अधिक नळजोड खंडित...

» महापालिकेच्या वतीने कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुली जोरदार सुरू असतानाच 2023-24 या आर्थिक वर्षात पाणी पट्टी वसुलीकडे आपला मोर्चा वळवला. गेल्या अनेक वर्षांपासून पाणी पट्टी न भरणाऱ्या 300 पेक्षा जास्त मालमत्ता धारकांचे नळजोड खंडित करण्याची कारवाई केली. मीटर निरीक्षक यांना कर संकलन वसुली पथकाची साथ मिळाली आणि या कारवाईमुळेच 60 कोटींच्या पुढे कधीही वसूल न होणारी पाणीपट्टी आता 80 कोटींच्या घरात गेली आहे.

---

## “संजोग वाघेरे आगे बढो, हम तुम्हारे साथ है”!

### संजोग वाघेरेंच्या प्रचारात पिंपरीगावातील महिला आघाडीचा आव्वाज

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी गावातून आज सकाळपासूनच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ वाघेरे पाटील यांच्या पत्नी पिंपरी चिंचवड महापलिकेच्या माजी नगरसेविका उषाताई संजोग वाघेरे पाटील यांनी प्रचारफेरीत नागरिकांच्या भेटी गाठी घेतल्या. या वेळी महिलावर्गाकडून त्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. या प्रचारफेरीत महिला स्वतःहून उत्स्फूर्तपणे सामील झाल्या होत्या. या सर्वांनी एकत्र येत मोठ्या जल्लोषात उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा प्रचार केला.**

‘संजोग वाघेरे आगे बढो, हम तुम्हारे साथ है’, ‘येऊन येऊन येणार कोण? संजोग वाघेरे पाटील पाटलानशिवाय दुसरं आहेच कोण?’ अशा जोरदार घोषणांनी देत महिलांनी परिसर दणाणून सोडला. शिवसेनेच्या महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसमवेत पिंपरी गावातील महिलांची गर्दी यावेळी मोठी पहायला मिळत होती. उमेदवार संजोग वाघेरे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातून प्रचारात मोठी आघाडी घेतली असून त्यांना समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. महिलावर्गातही त्यांना मोठे स्थान असून त्या वाघेरेंचा प्रचारार्थ मोठ्या उत्सहात सहभागी होत आहेत.

पिंपरी गावातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, कालभैरवनाथ मंदिर, हनुमान मंदिर, न्हावेआळी, वाघेरे कॉलोनी, सौंदर्य गणेश मंदिर, सौंदर्य चौक अश्या विविध भागातून प्रचार -याली काढण्यात आली. माजी नगरसेविका उषा सांजोग वाघेरे, स्नेहा वाघेरे, ज्योती वाघेरे, मनीषा वाघेरे, वासंती शिंदे, रसिका वाघेरे, मनीषा कांबळे, स्मिता वाघेरे, सुनंदा वाघेरे यांच्यासह महिला कार्यकर्त्या, युवा कार्यकर्ते, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.



### उषाताई वाघेरे पाटील यांचे आवाहन...

» दरम्यान, भाजप सरकारने जी खोटी आश्वासने दिली त्याच्या विरोधात या निवडणुकीच्या माध्यमातून शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी नागरिकांशी अधिकाधिक प्रमाणामध्ये संपर्क करावा”. असे आवाहन वाघेरे यांच्या पत्नी उषाताई वाघेरे पाटील यांनी मतदारांना केले. या वेळी पिंपरी गावातील विविध महिला बचत गट, महिला, युवक संघटना, विविध समाजाच्या संघटना, परिसरनिहाय कार्यकर्त्यांचा संच यांनी शिवसेनेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा जाहीर देत असून विजयी आपलाच अशा भावना या वेळी व्यक्त करण्यात आल्या.



भूमिका

# दिल्लीत भाजपचा ‘हार्दिक पंडया’ क्षण?

**केजरीवालांची राजकीय गळचेपी करायची असेल तर त्यांना बरीच वर्षे तुरुंगात टाकावे लागेल. त्यासाठी मद्यविक्री घोटाळयात त्यांना शिक्षा व्हावी लागेल. सध्या तरी त्यांची लोकप्रियता वाढवण्याचे कामच भाजपकडून होते आहे..**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या समर्थनासाठी नियमांवर बोट ठेवता येईल. केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नऊ वेळा नोटीस बजावली होती, तरीही ते आले नाहीत. त्यामुळे ‘ईडी’ला केजरीवालांना अटक करण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद केला जातो. तांत्रिकदृष्टया कदाचित तो योग्यही असेल. पण राजकारणामध्ये सगळया गोष्टी तांत्रिक असत्या तर निर्णयप्रक्रिया फक्त सनदी अधिकाऱ्यांनी राबवली असती. शासनाची गरज उरली नसती. मग नायब राज्यपालांना, ‘तुरुंगातून सरकार चालवता येत नाही’, असे म्हणावे लागले नसते. केजरीवालांसंदर्भात भाजपचा युक्तिवाद कितीही अचूक असला तरी त्यामागील ‘विरोधकमुक्त भारता’चा हेतू लपत नाही. शिवाय, केजरीवालांना अटक करून भाजपने ‘आम्हाला ३७० जागा मिळवणे कठीण दिसतेय’, अशी एक प्रकारे कबुली दिलेली आहे. २०१९ मध्ये दिल्लीमधील सातही जागा भाजपने जिंकल्या होत्या, या वेळी लोकसभा निवडणुकीत उमेदवार बदलूनदेखील सर्व जागा भाजपला मिळवता आल्या नाहीत



तर केजरीवालांच्या अटकेचाही फायदा झाला नाही असे म्हणावे लागेल. लोकसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रापासून बिहार-आंध्र प्रदेश अशा कुठल्या कुठल्या राज्यांमध्ये भाजपने मित्र शोधण्याची धडपड केली, दिल्लीत केजरीवालांना; तर झारखंडमध्ये हेमंत सोरेन या दोन्ही मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले, हा सगळा आक्रमकपणा ‘३७०’च्या घोषणेमुळे झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसदेत ‘३७०’ची घोषणा केली नसती आणि भाजपवर लक्ष्य गाठण्याचा दबाव आला नसता तर कदाचित भाजपने आघाडयांचे आणि अटकांचे सत्र सुरू केले नसते. राम मंदिर, सीएए वगैरे नेहमीच्या हिंदूत्ववादी मुद्दयांवर निवडणूक लढवता आली असती आणि ती जिंकताही आली असती. केजरीवालांची कळ काढून भाजपने स्वत:चा ‘हार्दिक पंडया’ तर करून घेतला नाही, असे कोणी विचारू शकेल. सध्या हार्दिक पंडया अहमदाबादमध्ये असो नाही तर मुंबई; जिकडे जाईल तिकडे प्रेक्षक त्याची हुर्यो करत आहेत. तसेच दिल्लीत भाजपचे झाले आहे.ईडी’ने अटक करूनही केजरीवाल बधत नाहीत असे दिसते. उलट, त्यांनी देशभरातील ‘इंडिया’तील नेत्यांना दिल्लीत एकत्र आणले. तृणमूल काँग्रेस ‘इंडिया’त आहे की नाही असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती होती. पण केजरीवालांच्या अटकेनंतर तृणमूलचे नेतेदेखील रामलीला मैदानावरील भाजपविरोधी सभेला आले होते. ‘इंडिया’ आघाडी खरेतर निपचित पडलेली होती, त्यांच्यातील भांडणे संपत नव्हती, तिच्यामध्ये उभे राहण्याचीही ताकद उरलेली नव्हती. हेच नेते रविवारी थेट दिल्लीत आले, त्यांच्या सभेवर ‘ठगों का मेला’ असे म्हणत भाजपला प्रत्युत्तर द्यावे लागत आहे. हे पाहिले तर ऐन लोकसभा निवडणुकीत भाजपची सगळी ऊर्जा केजरीवालांच्या अटकेचे समर्थन करण्यात तर वाया जाणार नाही, असा मुद्दा उपस्थित होऊ शकतो.केजरीवाल हेदेखील मोदींप्रमाणे चतुर राजकारणी आहेत. आपल्याविरोधातील प्रत्येक टीकेचा, कृतीचा मोदी नेहमी आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतात; तसेच केजरीवाल करत आहेत. केजरीवालांनी तुरुंगातून लोकांशी संवाद साधणे सुरू केले आहे, त्यांची पत्नी सुनीता केजरीवाल त्यांच्या वतीने प्रसारमाध्यमांशी संवाद साधत आहेत. ‘आप’ने केजरीवालांच्या पाठिंब्यासाठी दिल्लीकरांना सक्रिय होण्यास भाग पाडले आहे, त्यासाठी मोहीम चालवली जात आहे. निदान दिल्लीत तरी सगळे लक्ष केजरीवालांकडे वळले आहे. दिल्लीकरांना आणि प्रसारमाध्यमांना मोदींपेक्षा केजरीवाल काय करू शकतील, याची चर्चा करण्यात अधिक रुची वाटू लागली आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात एखाद्या नेत्यांची लोकांमध्ये सातत्याने चर्चा होत असेल तर त्या नेत्याला आणखी काय हवे? दिल्लीमध्ये भाजपच्या नेत्यांना फक्त केजरीवालांबद्दल बोलावे लागत आहे. आम आदमी पक्षाचे नेतेही दररोज पत्रकार परिषदा घेऊन, पत्रकारांना बाइट देऊन केजरीवालांना प्रकाशझोतात ठेवत आहेत.

## संपादकीय »

# जाता मूढापाशी

***राजकीयदृष्ट्या दरिद्री पक्ष करापोटी इतकी भव्य रक्कम मायभूस देणे लागतो तर धनवंत, यशवंत, कीर्तिवंत, सत्तावंत भाजपचे करपात्र देणे किती?***

‘कर आणि मृत्यू यांइतके शाश्वत मुद्दे जगात अन्य कोणते नाहीत”, हे कालातीत विधान बेंजामिन फ्रँकलीन यांचे. ते सद्य:स्थितीत काँग्रेसला तंतोतंत लागू पडते. एकतर आगामी निवडणुकीत सत्ताधारी भाजप ‘चारसो पार’ जाणार असल्याने काँग्रेसचा राजकीय मृत्यू अटळ तर दुसरीकडे त्याच वेळी महासत्ता होऊ पाहणाऱ्या मायदेशाच्या तत्पर, कर्तव्यकठोर, नेक अशा आयकर खात्याने त्या पक्षास १८२३ कोटी रु. अधिक १७४५ कोटी रु. – म्हणजे एकंदर ३५६७ कोटी रु. इतक्या अबब रकमेचा कर भरण्यासाठी काढलेली नोटीस. हे म्हणजे बुडून मरण पावलेल्यास पुन्हा तोफेच्या तोंडी देण्याचा आदेश काढण्यासारखे. तसे झाले आहे खरे. तेव्हा त्याची दखल घेणे क्रमप्राप्त. एरवी खरे तर काँग्रेस पक्षात दखलपात्र असे उरले आहे काय? जेमतेम पन्नास खासदारांचा हा पक्ष कुठे आणि त्या विरोधात आकाराने दसपट ‘चारसो पार’ जाणारा सत्ताधारी भाजप कुठे?

अमेरिकेतील दोन बडया कंपन्यांना गेल्या काही आठवडयांमध्ये तेथील सरकार वा नियामकांनी पळता भुई थोडी केली आहे. तसे पाहायला गेल्यास दोन्ही नाममुद्रा या अमेरिकी यशोगाथा म्हणून मखरात बसवता येतील. पण बोईंग आणि ॲपल या दोन्ही कंपन्यांना त्याची गरज नाही आणि अमेरिकेची तशी कॉर्पोरेट संस्कृती नाही.

# बडयांवर बडग्याची बाजारकेंद्री ‘संस्कृती’

बोईंग आणि ॲपलवरील आरोप गंभीर आहेत. अनुक्रमे अक्षम्य हेळसांड आणि अनियंत्रित मक्तेदारीचा ठपका दोन कंपन्यांवर लावण्यात आला आहे. बाजारवर्चस्वाची ईर्षा व्यापारविश्वात सर्वाधिक आदिम. पण बाजारवर्चस्व आणि मक्तेदारी यांच्यातील सीमारेषा खूपच पुसट असते. तसेच, अव्वल स्थानावर जाण्यासाठी वा टिकून राहण्यासाठी मूल्यांचा बळी देण्याची प्रवृत्ती इतर क्षेत्रांप्रमाणेच उद्योग क्षेत्रातही असतेच. ॲपलने मक्तेदारीचा गैरवापर केला असा त्यांच्यावर ठपका. त्यासंदर्भात अमेरिकेतील १६ राज्ये आणि न्याय विभागाने अमेरिकेवर दावा दाखल केला आहे. बोईंगने एअरबसबरोबर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सुरक्षात्रुटींकडेच दुर्लक्ष केले, असा त्यांच्यावर आरोप.

त्यावर अमेरिकी विमानवाहतूक आयोगाकडून संभाव्य कारवाई होण्याआधीच बोईंगच्या उच्चपदस्थांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली आहे. बोईंगचे प्रकरण अधिक गंभीर आहे.




२०१८ आणि २०१९ या दोन वर्षांमध्ये त्यांचे अद्ययावत बनावटीचे बोईंग – ७३७ मॅक्स हे विमान दोन वेळा दुर्घटनाग्रस्त झाले. एकदा इंडोनेशियात आणि एकदा इथियोपियात. दोन्ही दुर्घटनांमध्ये मोठया प्रमाणावर जीवितहानी झाली.

चौकशीअंती विमानाच्या सॉफ्टवेअर प्रणालीमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे आढळून आले. चाचणीदरम्यानच या त्रुटींची कल्पना बोईंग व्यवस्थापनाला आली होती. पण नवीन विमान त्वरेने बाजारात आणण्यासाठी त्रुटींकडे दुर्लक्ष करण्यात आले. विशेष म्हणजे याची कबुली व्यवस्थापनाला द्यावी लागली. तरीही यातून कंपनीने काहीच बोध घेतला असे दिसले नाही. कारण ५ जानेवारी रोजी अलास्का एअरलाइन्सचा, वापरात नसल्याने सांध्यांची निगा न राखलेला दरवाजाच उड्डाणादरम्यान निखळला.

त्याच्या सांधेखिटया पुरेशा खबरदारीने बसवल्या नसल्याचे नंतर चौकशीत आढळून आले. जीवघेण्या अपघातांनंतरही बोईंगच्या ‘संस्कृती’मध्ये फरक पडलेला नाही. झटपट उत्पादनाच्या मोहापायी सुरक्षा तपासण्या उरकण्याकडे कल वाढू लागला आहे. बोईंगकडे विमान सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञांची संख्या पुरेशी नाही आणि या मूलभूत समस्येकडे हवे तितके लक्ष दिले गेलेले नाही, असे अनेक मुद्दे फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन या अमेरिकी विमान वाहतूक नियमन संस्थेने अधोरेखित केले आहेत. खुद्द बोईंग कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डेव्ह कॅलहाउन या वर्षअखेरीस पायउतार होत आहेत; तर प्रवासी विमाननिर्मिती प्रमुख स्टॅन डील यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सोलापुरकरांसाठी मोदी सरकारचे 'समर गिफ्ट'!

## आ. सातपुते यांचे मत : वंदे भारत एक्स्प्रेससाठी कोचिंग डेपोला मंजुरी

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शाश्वत विकासाचा अजेंडा राबवला आहे. मुंबई, पुणे अशा प्रगतीशील शहरांच्या बरोबरीने आता सोलापुरातसुद्धा 'वंदे भारत एक्स्प्रेस'साठी कोचिंग डेपोला केंद्र सरकारने मंजुरी दिली. त्यामुळे शहराची नवी ओळख निर्माण होणार असून, सोलापुरकरांसाठी हे "समर गिफ्ट" आहे, असे मत आमदार राम सातपुते यांनी व्यक्त केले.**




सोलापुरात 'वंदे भारत एक्स्प्रेस'साठी कोचिंग डेपो बांधण्याला रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली. सुमारे ५० कोटी रुपये खर्चून हा डेपो उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मध्य रेल्वेच्या बांधकाम विभागाकडून हे काम करण्यात येणार आहे. राम सातपुते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्यात आली. सोलापूर विभागातून सध्या दोन 'वंदे भारत एक्स्प्रेस' धावत आहेत. यात सोलापूर-मुंबई व कलबुर्गी-बंगळुरू यांचा समावेश आहे. पैकी मुंबईला जाणाऱ्या गाड्यांची देखभाल व दुरुस्ती मुंबईत होत आहे, तर कलबुर्गीहून सुटणाऱ्या 'वंदे भारत एक्स्प्रेस'चे बंगळुरू येथे देखभाल व दुरुस्ती केली जात आहे. सोलापूरला डेपो झाल्यानंतर येथेच डब्यांची देखभाल व दुरुस्ती होणार आहे. त्यामुळे भविष्यात सोलापुरातून सुटणाऱ्या 'वंदे भारत एक्स्प्रेस' गाड्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांना होईल.

सोलापूर रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील म्हणाले की, कोचिंग डेपोसाठी ६०० मीटर लांबीची नवीन पिटलाइन, डब्यांच्या सुरक्षेसाठी कव्हर्ड शेड बांधण्यात येणार आहे. एक रेकच्या देखभाल व दुरुस्तीसाठी किमान ६ तास लागतील. एक स्वतंत्र इमारत बांधण्यात येणार आहे. सोलापुरात बांधला जाणारा हा मध्य रेल्वेचा तिसरा डेपो असणार आहे. सध्या मुंबई विभागात (वाडी बंदर) असा डेपो असून, दुसरा डेपो पुण्यातल्या घोरपडी भागात बांधण्याचे काम सुरू झाले आहे.

> "देशात सध्या विविध लोहमार्गांवर ५१ 'वंदे भारत एक्स्प्रेस' धावत आहेत. येणाऱ्या काळात ही संख्या आणखी वाढणार आहे. कोणत्याही स्थानकावरून 'वंदे भारत एक्स्प्रेस' सुरू होण्यासाठी 'कोचिंग मेंटेनन्स डेपो' असणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातील केंद्र सरकारच्या माध्यमातून सोलापूर आणि परिसराच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्याचा संकल्प आहे. ज्यामुळे उद्योग-व्यावसाय आणि रोजगार निर्मितीला चालना मिळावी, असा निर्धार आम्ही केला आहे.
>
> -राम सातपुते, आमदार, भाजपा.

# वैद्यकीय क्षेत्रात देशाची प्रगती; म्हणून मोदींना साथ!

## सोलापूरमधील डॉक्टरांच्या भावना : राम सातपुते यांनी साधला संवाद

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात देशाने वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रात प्रगती केली आहे. कोविडसारख्या महामारीच्या काळात भारताने 'वसुधैव कुटुम्बकम्' या हेतुने संपूर्ण जगाला मदतीचा हात दिला आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्या. या करिता 'आयुष्मान भारत' सारखी महत्त्वाकांक्षी योजना राबवली. त्यामुळे सामान्य नागरिकांना आधार मिळाला. यासाठी आता पुन्हा एकदा मोदींना साथ देणार आहोत, असा विश्वास सोलापूरातील डॉक्टर व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे.**



सोलापूर लोकसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीचे अधिकृत उमेदवार राम सातपुते यांनी सोलापूर शहरातील अनेक डॉक्टरांशी संवाद साधला. याप्रसंगी डॉ. अमोल पाटील, भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, भाजपा नेते जयसिंगनाना आवताडे, डॉ. शैलेश पाटील, डॉ. सुनील हिलालपुरे, डॉ. मुक्तेश्वर शेटे, डॉ. अमोल माळगे, डॉ. होणराव तसेच अनेक भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. देशभरातील नागरिकांसाठी 'आयुष्मान भारत' योजना अत्यंत महत्त्वाची ठरली. प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विम्याचं संरक्षण देणाऱ्या या योजनेत ६ कोटी ७० लाखांपेक्षा अधिक गरजुंवर उपचार झाले आहेत.

त्यामुळे मोदीजींच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय क्षेत्रात चांगली कामगिरी होत आहे, जनसामान्यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा मिळत आहेत त्यामुळे पुन्हा एकदा आदरणीय मोदीजीनाच पंतप्रधानपदी पहायचं आहे, असे मत सर्व डॉक्टरांनी व्यक्त केले.

### पूर्ण ताकदीने आपल्यासोबत : पाटील

» दरम्यान, भाजपा जेष्ठ नेते शिवानंद (अण्णा) पाटील यांच्या निवासस्थानीही सातपुते यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी शिवानंद अण्णा यांनी त्यांचे स्वागत करत लोकसभा विजयासाठी शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले. या भेटीदरम्यान पुन्हा एकदा नरेंद्र मोदीजींना पंतप्रधान करण्यासाठी पूर्ण ताकदीने आपल्या सोबत आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

# अकोल्यात काँग्रेसकडून उमेदवार जाहीर, अभय पाटलांना तिकीट, तिरंगी लढत होणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अकोला लोकसभा मतदारसंघ काँग्रेसने डॉ अभय पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. उमेदवारी दाखल करण्यासाठी दोन दिवस उरले असताना काँग्रेसने अभय पाटील यांच्या नावाची घोषणा केली आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची घोषणा केली. भाजपने खासदार संजय धोत्रे यांचे चिरंजीव अनुप धोत्रे यांना उमेदवारी जाहीर करून सरशी केली. त्यामुळे अकोल्याची लढत आता तिरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला राज्यात सात जागांवर पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, ते स्वत: अकोल्यात लढत असल्याने काँग्रेस पक्ष त्यांना पाठिंबा देईल, अशी चर्चा होती. या मतदारसंघात प्रत्येक वेळी काँग्रेस आणि वंचितमध्ये मतविभाजन होऊन भाजपचा विजय झाला. मागील चार निवडणुकांमध्ये



हाच अनुभव असल्यामुळे वंचित बहुजन आघाडी व महाविकास आघाडी एकत्र लढणार, असे मानले जात होते. परंतु इथे काँग्रेसने उमेदवार देऊन अकोल्यात तिरंगी लढत केली आहे.

### मराठा समाजाच्या भूमिकेकडे लक्ष

प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील पाटील यांचे पहिल्या टप्प्यातील उमेदवारांना समर्थन असल्याचे सांगितले होते. हे लक्षात घेता अकोला लोकसभा मतदारसंघातील मराठा मतांचे विभाजन होण्याचा धोका व्यक्त होतोय. मराठा आरक्षण आंदोलनाच्या निमित्ताने अकोल्यात समाज एकवटला होता. हा समाज निवडणुकीत कुणाला पाठिंबा देतो यावरही बरेच अवलंबून आहे.

# केजरीवाल यांना 15 दिवसांची कोठडी!

## न्यायालयात हजर राहण्यापूर्वी पंतप्रधानांवर टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची १५ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडीत रवानगी होणार आहे. १५ एप्रिलपर्यंत त्यांना तिहार तुरुंगात ठेवलं जाईल. अंमलबजावणी संचालनालयाने केजरीवाल यांची १५ दिवसांची कोठडी मागितली होती. राऊस अ‍ॅवेन्यू कोर्टाने ही मागणी मान्य केली आहे. अतिरिक्त महाधिवक्ते एस. व्ही. राजू हे ईडीकडून न्यायालयासमोर हजर होते. त्यांनी न्यायालयाकडे केजरीवाल यांच्या १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती. कारण केजरीवालांनी चौकशीत कुठल्याही प्रकारचं सहकार्य केलं नाही. त्यांना विचारलेल्या प्रत्येक प्रश्नावर 'मला माहिती नाही' एवढंच उत्तर दिलं, असं ईडीने म्हटलं आहे.**

ईडीला दिल्लीच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याचा तपास पुढे न्यायचा आहे. इडीकडे असलेल्या प्रश्नांची उत्तरं देणं आवश्यक आहे. हे मुद्दे राजू यांनी न्यायालयासमोर मांडल्यानंतर न्यायालयाने केजरीवाल यांना १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.एस. व्ही. राजू म्हणाले, केजरीवाल यांनी ईडीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या फोनचा पासवर्ड सांगण्यास नकार दिला. त्यांनी इतर कुठल्याही डिजीटल डिव्हाईसचे पासवर्ड दिले नाहीत. ते कुठल्याही प्रश्नाचं योग्य उत्तर देत नाहीयेत. ते केवळ उडवाउडवीची उत्तरं देत आहेत. त्यांना कुठलाही प्रश्न विचारला तर त्यावर ते मैं नहीं जानता (मला माहिती नाही) एवढचं उत्तर देत आहेत.दरम्यान, केजरीवाल यांनी तुरुंगात त्यांच्याजवळ भगवद्गीता, रामायण हे दोन ग्रंथ ठेवण्याची परवानगी मागितली आहे. तसेच 'हाऊ प्राईम मिनिस्टर्स डिसाईड्स' (HOW PRIME MINISTERS DECIDE) हे पुस्तकदेखील त्यांना त्यांच्याजवळ हवं आहे. केजरीवाल तुरुंगातील १५ दिवसांमध्ये हे दोन ग्रंथ आणि पंतप्रधानांबाबतचं पुस्तक वाचतील. यासह त्यांनी तुरुंगात धार्मिक लॉकेट परिधान करण्याची परवानगी मागितली आहे. केजरीवालांनी त्यांची नियमित औषधं आणि विशेष डाएटचीदेखील मागणी केली आहे. ईडीच्या अधिकाऱ्यांनी केजरीवाल यांना आज न्यायालयासमोर हजर केलं. तत्पूर्वी न्यायालयाबाहेर प्रसारमाध्यमांनी केजरीवाल यांच्याशी बातचीत करण्याचा प्रयत्न केला. यावेळी केजरीवाल म्हणाले, पंतप्रधान मोदी जे काही करतायत ते चुकीचं आहे.केजरीवाल यांना तिहार तुरुंगात नेण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यांना तिहारमधील कोणत्या तुरुंगाती कोणत्या बराकीत ठेवलं जाणार यावर ईडीचे अधिकारी, तुरुंग व्यवस्थापन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये चर्चा चालू आहे. तिहारमध्ये एकूण ९ तुरुंग आहेत. या ९ तुरुंगांमध्ये सध्या एकूण १२,००० कैदी शिक्षा भोगत आहेत. ईडीला दिल्लीच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याचा तपास पुढे न्यायचा आहे. त्यामध्ये केजरीवाल यांनी सहकार्य करणं, इडीकडे असलेल्या प्रश्नांची उत्तरं देणं आवश्यक आहे. हे मुद्दे राजू यांनी न्यायालयासमोर मांडल्यानंतर न्यायालयाने केजरीवाल यांना १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. एस. व्ही. राजू म्हणाले, केजरीवाल यांनी ईडीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या फोनचा पासवर्ड सांगण्यास नकार दिला. त्यांनी इतर कुठल्याही डिजीटल डिव्हाईसचे पासवर्ड दिले नाहीत. ते कुठल्याही प्रश्नाचं योग्य उत्तर देत नाहीयेत. ते केवळ उडवाउडवीची उत्तरं देत आहेत. त्यांना कुठलाही प्रश्न विचारला तर त्यावर ते मैं नहीं जानताएवढचं उत्तर देत आहेत.

### केजरीवालांनी सहकार्य केलं नाही

» दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी राऊस अ‍ॅवेन्यू कोर्टाने १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. केजरीवाल आता १५ एप्रिलपर्यंत तुरुंगातच राहतील. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केजरीवाल यांची तिहार तुरुंगात रवानगी होऊ शकते. अंमलबजावणी संचालनालयाने केजरीवाल यांना आज (१ एप्रिल) न्यायालयासमोर हजर केलं. आजच्या सुनावणीवेळी ईडीने न्यायालयाकडे केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती. ही मागणी न्यायालयाने मान्य केली आहे. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू हे ईडीकडून न्यायालयासमोर हजर होते. त्यांनी न्यायालयाकडे केजरीवाल यांच्या १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती. कारण केजरीवालांनी चौकशीत कुठल्याही प्रकारचं सहकार्य केलं नाही. त्यांना विचारलेल्या प्रत्येक प्रश्नावर 'मला माहिती नाही' एवढंच उत्तर दिलं.ऊस अ‍ॅवेन्यू कोर्टाने ही मागणी मान्य केली आहे. अतिरिक्त महाधिवक्ते एस. व्ही. राजू हे ईडीकडून न्यायालयासमोर हजर होते. त्यांनी न्यायालयाकडे केजरीवाल यांच्या १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती. कारण केजरीवालांनी चौकशीत कुठल्याही प्रकारचं सहकार्य केलं नाही.

# नरेंद्र मोदींची गॅरंटी ही चीनच्या वस्तूंसारखी

## तेजस्वी यादव यांनी पंतप्रधान मोदी यांच्या मोहिमेवर टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**इंडिया आघाडीच्यावतीने ३१ मार्च रोजी दिल्लीत 'लोकतंत्र बचाव महारॅली' काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून देशभरातून जवळपास २८ पक्षांनी एकत्र येत भाजपावर हल्लाबोल केला. या सभेला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारही उपस्थित होते.**

या सभेत बोलताना बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत पंतप्रधान मोदींची गॅरंटी ही चीनच्या वस्तूंसारखी असल्याचा टोला लगावला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'मोदींची गॅरंटी' अशा स्वरूपाचा नारा दिला आहे. यानंतर 'मोदींची गॅरंटी' अशी एक मोहीम भाजपाकडून चालू करण्यात आली. या मोहिमेवर आता तेजस्वी यादव यांनी टीका केली. यादव म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली गॅरंटी ही चीनच्या वस्तूंसारखी आहे. जोपर्यंत निवडणुका आहेत, तोपर्यंत मोदींची गॅरंटी आहे. मात्र, निवडणुका संपल्यानंतर काही नाही. त्यामुळे मोदींची गॅरंटी ही फक्त निवडणुकीपर्यंत टिकेल", असा टोला तेजस्वी यादव यांनी लगावला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला आहे. यावरूनच तेजस्वी यादव यांनी भाजपावर गंभीर आरोप केला आहे. ते म्हणाले, "भाजपावाल्यांनी निवडणुकीच्या आधीच ४०० पारचा नारा दिल्यामुळे आधीच मॅच फिक्सिंग झाल्यासारखे वाटते आहे. मात्र, भाजपाचे नेते काही म्हणाले तरी जनता हीच देशाची मालक असते. त्यामुळे जनता जे ठरवेल तेच दिल्लीत सरकारमध्ये बसतील. काही झाले तरी या भाजपाला सत्तेतून बाहेर खेचा", असे तेजस्वी यादव म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या निवडणुकीवेळी काही आश्वासने दिले होते. त्यावर बोलताना तेजस्वी यादव यांनी तरुणांना भाजपाच्या खोट्या आश्वासनांना आणि खोट्या प्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन केले. "देशात बेरोजगारी, महागाई हे सर्वात मोठे दुश्मन आहेत.

### ईडी, सीबीआय भाजपाचे सेल

» मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणालाही कोणतीही नोकरी दिली नाही. सर्वच्या सर्व खाजगीकरण करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ईडी, सीबीआय आणि आयकर विभाग हे भाजपाचे सेल झाले आहेत", असा आरोप तेजस्वी यादव यांनी केला.इंडिया आघाडीच्यावतीने ३१ मार्च रोजी दिल्लीत 'लोकतंत्र बचाव महारॅली' काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून देशभरातून जवळपास २८ पक्षांनी एकत्र येत भाजपावर हल्लाबोल केला. या सभेला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारही उपस्थित होते.

# विलास लांडेंची ताकद महायुती सोबतच!

## लोकसभा निवडणूक : नियोजन बैठकीसाठी लांडे यांची उपस्थिती

। पिंपरी ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज असलेले माजी आमदार विलास लांडे महायुतीची साथ सोडतील अशी चर्चा होती. मात्र या चर्चांना आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. शिरूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या समर्थनात शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या पुढाकाराने भोसरीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विलास लांडे यांचे चिरंजीव विक्रांत लांडे देखील उपस्थित होते. त्यामुळे लांडे आपली ताकद महायुती सोबतच उभी करतील, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**



प्रबळ दावेदार असताना देखील उमेदवारी न दिल्याने विलास लांडे नाराज होते. शिवाजीराव आढळरावांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून ते राजकीय आखाड्यातून काही दिवस बाहेरच राहिले आहेत. खासदार शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत प्रवेश करतील असे चर्चा रंगल्या होत्या. तसे झाले असते तर महायुतीला त्याचा मोठा फटका सहन करावा लागला असता. मात्र लांडे यांनी कोणतीही वेगळी भूमिका सद्या तरी घेतली नसल्याचे दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली असणाऱ्या राष्ट्रवादीच्या बैठकीला त्यांचे समर्थक आणि पुत्र विक्रांत लांडे उपस्थित राहत असल्याचे दिसत आहे.

शिरूर मध्ये महायुती मधील राष्ट्रवादीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचाराचे नियोजन करण्यासाठी भोसरीत बैठक आयोजित करण्यात आली होती. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीला विक्रांत लांडे देखील उपस्थित होते. त्यांची उपस्थिती लांडे यांची ताकद महायुती सोबत असल्याचे दर्शवणारी आहे. त्यामुळे आठवडाभरात लांडे शरद पवार यांच्या सोबत जातील अशा रंगलेल्या चर्चांना आता पूर्ण विराम मिळेल. सुरुवातीच्या टप्प्यात विलास लांडे यांनी नाराजी दाखवली खरी. मात्र सद्या तरी त्यांनी आपली भूमिका मवाळ केल्याचे दिसत आहे. लांडे यांचे कट्टर मतदार महायुतीचा धर्म पाळतील हे सद्या तरी दिसत आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना फायदा होणार आहे.

### ...तरीही लांडे अजितदादांसोबत!

» विलास लांडे यांचा राजकीय गोतावळा मोठा आहे. खासदार शरद पवार, जयंत पाटील यांच्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. राष्ट्रवादीच्या फुटित लांडे शरद पवार यांच्यासोबत जातील असे मत व्यक्त होत होते. मात्र तसे झाले नाही. लोकसभेला उपुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारी दिली नाही. तरी देखील लांडे यांनी तडकाफडकी भूमिका घेतली नाही. ते अद्यापही अजित दादांच्या सोबतच असल्याचे दिसते. लांडे यांच्या या निष्ठेचा उपमुख्यमंत्री अजित पवार विचार करून योग्य संधी देतील का हे पाहावे लागणार आहे.

---

# बूथ प्रमुखांच्या मेळाव्यास जोरदार प्रतिसाद!

## शरद पवार गट : युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांचे शक्तिप्रदर्शन

। पिंपरी ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पक्ष फुटी नंतर मोठ्या संख्येने नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकारी शरदचंद्र पवार यांना सोडून गेल्यानंतर देखील प्रतिकूल परिस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील युवक पदाधिकारी, महिला आणि विद्यार्थी पदाधिकाऱ्यांनी पक्षातील एकनिष्ठ लोकांच्या सोबतीने भोसरी विधानसभेतील 464 बूथ कमिटीची संपूर्ण बांधणी करून पक्ष संघटना आजही दमदार असल्याचा संदेश शहरातील इतर पक्षातील लोकांना दिला.**



राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)आयोजित बूथ प्रमुख संवाद मेळावा युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्या नेतृत्वात भोसरी येथील क्वालिटी सर्कल हॉल येथे पार पडला. यावेळी भोसरी विधानसभेतील बूथ अध्यक्ष यांना प्रशिक्षण देण्यात आले. या मेळाव्यास विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे राज्य उपाध्यक्ष प्रकाश म्हस्के, युवक निरीक्षक तसेच वैद्यकीय सेल प्रदेशाध्यक्ष गौतम आगा, महिला शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर, पुणे जिल्हा ग्रामीण युवक अध्यक्ष स्वप्निल भैय्या गायकवाड,सागर दादा कोल्हे, युवक शहर कार्याध्यक्ष सागर तापकीर, वरिष्ठ नेते शिरीष जाधव,विद्यार्थीअध्यक्ष राहुल आहेर, विशाल मुरलीधर जाधव,युवक विधानसभा अध्यक्ष संतोष शिंदे,युवक महिला अध्यक्ष सारिका हरगुडे,युवक पदाधिकारी रजनीकांत गायकवाड, मेघराज लोखंडे,ॲड अमोल गव्हाणे, असिफ शेख,अजय मालवदे,शकील शेख,रेखाताई मोरे,जयमाला कदम,ताहेरा सय्यद,हाजीमलंग शेख, बबिता बनसोडे व मोठ्या संख्येने युवक पदाधिकारी महिला पदाधिकारी आदरणीय पवार साहेबांना मानणारे नागरिक उत्स्फूर्तपणे उपस्थित होते.

निरीक्षक प्रकाश म्हस्के म्हणाले "नेते पदाधिकारी जरी भाजपाच्या गळाला लागले असतील तरी सर्वसामान्य कार्यकर्ता आणि मतदार हा फक्त आदरणीय शरद पवार साहेब यांच्या सोबतच आहे. युवक अध्यक्ष इम्रान शेख,महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर आणि सहकाऱ्यांनी भोसरी सारख्या अवघड विधानसभेत इतक्या शिस्तबद्ध पद्धतीने मोठ्या संख्येने बूथ अध्यक्षांचा मेळावा आयोजित केला.यांचे कौतुक केले.शिरूर लोकसभेतील सहा विधानसभापैकी भोसरी विधानसभेतून सर्वाधिक मताधिक्य अमोल कोल्हे यांना मिळेल यात शंका नाही असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना विद्यार्थी प्रदेश अध्यक्ष सुनील गव्हाणे म्हणाले "९ वर्षांच्या असफल सत्तेच्या उपभोगानंतर राज्यात केलेल्या प्रत्येक सर्वेत भाजप पिछाडीवर असल्याचे रिपोर्ट होते. म्हणून लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांचे खच्चीकरण करण्यासाठी 50 खोक्यांच्या, इडी आणि सीबीआयच्या जीवावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडून त्यांची ताकद कमी करण्याचा रडीचा डाव भाजपाने महाराष्ट्रात खेळला परंतु त्यांचे फासे त्यांच्यावरच उलटे झाले असून महाराष्ट्रातील तमाम मायबाप जनता या गद्दारीला सहन करणार नाही. या लोकसभेत सर्वात जास्त संख्येने महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### कोल्हे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार !

» युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले "ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्ती असून जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींना ईडी, सीबीआयच्या बंदुकीच्या धाकावर भाजपात घेणाऱ्या राक्षसी प्रवृत्ती विरुद्ध सामान्य नागरिक पेटून उठलेला आहे. महागाई, स्त्रियांवरील अत्याचार,जातीयवाद, बेरोजगारी या प्रमुख मुद्द्यासहित पुणे जिल्ह्यातील युवकांचे रोजगार गुजरातला पळवणाऱ्या केंद्र सरकारच्या विरोधात महिला तसेच युवकांमध्ये तीव्र नाराजी असून सर्वसामान्य नागरिक, बेरोजगार युवा या जुलमी सरकारला मातीत गाडायला स्वतःहून पुढे सरसावली आहेत.त्यामुळे शिरूर लोकसभेची ही निवडणूक लोकांनी स्वतःच्या अंगावर घेतली आहे.लोक आदरणीय शरदचंद्रजी पवार यांच्या बाजूला उभे राहतील याचा ठाम विश्वास आम्हाला आहे.यावेळी भोसरी विधानसभेतील मायबाप जनता खासदार अमोल कोल्हे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार आहे असेही ते म्हणाले.

# माहीने लावली विक्रमांची रांग!

## महेंद्रसिंग धोनीने एका सामन्यात रचले पाच विक्रम

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था



**आयपीएल २०२४च्या हंगामातील सामना रविवारी विशाखापट्टणम येथे पार पडला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने चेन्नई सुपर किंग्जचा २० धावांनी पराभव करत पहिला विजय नोंदवला. यंदाच्या हंगामात महेंद्रसिंग धोनी या सामन्याच्या माध्यमातून पहिल्यांदाच फलंदाजीसाठी मैदानात उतरला. पण त्याची ही एक इनिंग खूप चर्चेत आहे. विशेष म्हणजे या सामन्यातील दिल्ली कॅपिटल्सच्या विजयापेक्षा धोनीची फलंदाजीच जास्त चर्चा आहे. कारण माहीने १६ चेंडूत नाबाद ३७ धावांची खेळी साकारत अनेक विक्रमाला गवसणी घातली.**

विशाखापट्टणममध्ये झालेल्या या सामन्यात पाच मोठे नवीन विक्रम आपल्या नावावर केले. पहिला विक्रम, टी-२० मध्ये ७००० धावा पूर्ण करणारा पहिला आशियाई यष्टिरक्षक ठरला. दुसरा विक्रम, धोनीने भारतीयांमध्ये एका षटकात सर्वाधिक २० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. धोनीच्या नावावर तिसरा विक्रम, आयपीएलमध्ये ५००० धावा पूर्ण करणारा पहिला यष्टिरक्षक फलंदाज. चौथा विक्रम, आयपीएलमध्ये १९व्या आणि २०व्या षटकात १०० षटकार पूर्ण करणारा पहिला फलंदाज बनला. पाचवा विक्रम, टी-२० मध्ये ३०० फलंदाजांना यष्टीच्या मागे बाद करणारा पहिला यष्टीरक्षक ठरला आहे.एमएस धोनी टी-२० मध्ये यष्टिरक्षक म्हणून ७००० धावा करणारा पहिला आशियाई फलंदाज ठरला. या यादीत पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवान (६९६२) आणि कामरान अकमल (६४५४) यांची नावे आहेत.एमएस धोनीने आयपीएलच्या एका डावात ९ वेळा एका षटकांत २० धावा केल्या आहेत, जी सर्वाधिक वेळा आहे. ॲनरिक नॉर्टजेच्या शेवटच्या षटकात त्याने २० धावा केल्या. या यादीत रोहित शर्मा, ऋषभ पंत, वीरेंद्र सेहवाग, युसूफ पठाण आणि हार्दिक पंड्या यांच्या नावांचा समावेश आहे. रोहित शर्मने ८, ऋषभ पंतने ६ धावा, वीरेंद्र सेहवाग, युसूफ पठाण आणि हार्दिक पंड्याने प्रत्येकी ५ वेळा २० धावा केल्या आहेत.एमएस धोनी आयपीएलच्या इतिहासात यष्टीरक्षक म्हणून ५००० किंवा त्याहून अधिक धावा करणारा पहिला फलंदाज ठरला आहे. या यादीत ४२३३ धावांसह दिनेश कार्तिक, ३०११ धावांसह रॉबिन उथप्पा, २८१२ धावांसह क्विंटन डी कॉक आणि २७३७ धावांसह ऋषभ पंत यांचा समावेश आहे. एमएस धोनी आयपीएलच्या एका डावाच्या १९व्या आणि २०व्या षटकात १०० षटकार मारणारा पहिला फलंदाज ठरला. किरॉन पोलार्ड ५७, एबी डिव्हिलियर्स ५५, हार्दिक पंड्या ५५, आंद्रे रसेल ५१ आणि रवींद्र जडेजा ४६ षटकारांसह या यादीत सामील आहेत.एमएस धोनीने पृथ्वी शॉचा एक सोपा झेल घेतला आणि टी-२० क्रिकेटमध्ये ३०० फलंदाजांना बाद (कॅच + स्टंप) करणारा पहिला यष्टिरक्षक बनला. चेन्नई सुपर किंग्जच्या दिग्गज खेळाडूने दिनेश कार्तिक आणि क्विंटन डी कॉकसारख्या दिग्गजांना मागे टाकत ही कामगिरी केली आहे. विशाखापट्टणममध्ये झालेल्या या सामन्यात पाच मोठे नवीन विक्रम आपल्या नावावर केले. पहिला विक्रम, टी-२० मध्ये ७००० धावा पूर्ण करणारा पहिला आशियाई यष्टिरक्षक ठरला. दुसरा विक्रम, धोनीने भारतीयांमध्ये एका षटकात सर्वाधिक २० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत.

### 7000 धावा करणारा फलंदाज

» धोनीच्या नावावर तिसरा विक्रम, आयपीएलमध्ये ५००० धावा पूर्ण करणारा पहिला यष्टिरक्षक फलंदाज. चौथा विक्रम, आयपीएलमध्ये १९व्या आणि २०व्या षटकात १०० षटकार पूर्ण करणारा पहिला फलंदाज बनला. पाचवा विक्रम, टी-२० मध्ये ३०० फलंदाजांना यष्टीच्या मागे बाद करणारा पहिला यष्टीरक्षक ठरला आहे. एमएस धोनी टी-२० मध्ये यष्टिरक्षक म्हणून ७००० धावा करणारा पहिला आशियाई फलंदाज ठरला. या यादीत पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवान (६९६२) आणि कामरान अकमल (६४५४) यांची नावे आहेत. एमएस धोनीने आयपीएलच्या एका डावात ९ वेळा एका षटकांत २० धावा केल्या आहेत, जी सर्वाधिक वेळा आहे. ॲनरिक नॉर्टजेच्या शेवटच्या षटकात त्याने २० धावा केल्या.

# चेन्नईविरूद्धचा विजय दिल्लीला पडला भारी!

## ऋषभ पंतला सामन्यानंतर 12 लाखांचा दंड ठोठावण्यात आला

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज



**चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या सामन्यात ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील दिल्लीने चेन्नईचा विजयरथ रोखला. चेन्नईने सलग २ सामने जिंकले होते, पण चेन्नईचा संघ दिल्लीविरुद्ध कामगिरी करण्यात अपयशी ठरला. दिल्लीने चेन्नई सुपर किंग्जचा २० धावांनी पराभव करत यंदाच्या हंगामातील पहिला विजय नोंदवला. दिल्लीने सामना जिंकला असला तरी दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतला सामना संपल्यानंतर १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.**

दिल्ली संघाने शानदार कामगिरी करत विजय तर मिळवला पण हा विजय संघाला चांगलाच भारी पडला आहे. कारण विजयानंतर पंतला स्लो ओव्हर रेटमुळे दंड ठोठावण्यात आला. षटकांची गती न राखल्याबद्दल कारवाई पंतला आयपीएलच्या आचारसंहितेनुसार १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. याच मोसमात गुजरात संघाचा कर्णधार शुभमन गिललाही स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला होता. विशेष म्हणजे गिलवरही चेन्नईविरुद्धच्या सामन्यादरम्यान हा दंड ठोठावण्यात आला होता. माहीने या सामन्यात १६ चेंडूत ३७ धावांची खेळी केली आहे. ४२ वर्षीय धोनीच्या बॅटमधून ४ चौकार आणि ३ षटकारांची शानदार खेळी पाहायला मिळाली.दिल्ली आणि चेन्नई यांच्यातील हा सामना खूपच रोमांचक झाला. या सामन्यात चाहत्यांच्या दोन्ही इच्छा पूर्ण झाल्या. एक म्हणजे ऋषभ पंतला पुनरागमनानंतर स्फोटक खेळी खेळताना पाहणे आणि दुसरं म्हणजे धोनीची फलंदाजी. गुरू-शिष्याच्या या जोडीने चाहत्यांसाठी या सामन्यात जणू पर्वणीच आणली होती. धोनी आणि पंतचा एकहाती षटकारही दोघे फलंदाजी करताना पाहायला मिळाला. ज्याचे व्हीडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत.

### खलीलने रचिला पाया

» दिल्ली कॅपिटल्स संघाने बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सला नमवत आयपीएल २०२४ मधील पहिला विजय नोंदवला. चेन्नईचा दिल्ली संघाने २० धावांनी पराभव केला आणि आपले खाते उघडले आहे. सामना दिल्लीने जिंकला असला तरी चर्चा रंगली ती ४२व्या वर्षी १६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ३७ धावांची खेळी करणाऱ्या महेंद्रसिंग धोनीची. 'माही मार रहा है' या उक्तीचा प्रत्यय घडवत धोनीने षटकार, चौकार लगावणं विसरलो नसल्याचं दाखवून दिलं. पण चेन्नईला धोनीची ही खेळी विजय मिळवून देऊ शकली नाही.दिल्लीने दिलेल्या १९२ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ १७१ धावाच करूच शकला. खलील अहमद आणि मुकेश कुमारच्या शानदार गोलंदाजीने चेन्नईच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला.